कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १९/१९९४.

क्र. राप/आस्था/ ४०८-ई/४४७७.
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८. दिनांक : ८ .९.१९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण],
रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी पुणे.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/पालघर/
रायगड [पेण]/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/कोल्हापूर/
सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/
उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/अमरावती/भंडारा/बुलढाणा/
चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

विषय : विशेष भरती मोहिमेद्वारे सुरक्षा रक्षक पदातील मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्याबाबत.

संदर्भ : या खात्याचे परिपत्रक क्र. [इंग्रजी]एससी/ईएसटी/ ४०८-ई/४१८२, दिनांक ७.१०.१९८५.

...

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार आपणास अशा सूचना देण्यात आल्या होत्या की, सुरक्षा रक्षक पदावर १००% भरती ही माजी सैनिकांमधूनच केली जाईल. तसेच माजी सैनिकांना सुरक्षा रक्षक पदी नेमणूक देण्यासाठी सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्यास संपूर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेले होते आणि अशा नेमणुकीकरिता निवड समितीने उमेदवारांची निवड करून देण्याची आवश्यकता राहणार नाही असे कळविलेले होते. सदरच्या सूचनांची विभागांनी अंमलबजावणी केल्यानंतर प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमातीचे उमेदवार माजी सैनिक म्हणून अनुशेष भरून काढण्यासाठी सप्टें. १९८९ ते ३१ मार्च, १९९२ च्या विशेष भरती मोहिमेमध्ये उपलब्ध होऊ शकलेले नाहीत, तसेच आता शासनाने परत विशेष भरतीची मोहिम दिनांक ३१.७.१९९३ या मागासवर्गीयांचा शिल्लक अनुशेष भरून काढण्यासाठी कार्यान्वीत केलेली आहे, आणि सदरच्या मोहिमेची मुदत दि. ३१.१२.१९९४ पर्यंत आहे, परंतु सुरक्षा रक्षक पदातील मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्यासाठी संदर्भित परिपत्रकातील सूचनामुळे [सुरक्षा रक्षकाकरिता माजी सैनिक हीच अट ] अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब आता व्यवस्थापनाच्या नजरेस आलेली असून सदरची वस्तुस्थिती विचारात घेऊन आता असे ठरविण्यात आलेले आहे की, सुरक्षा रक्षक पदावर नेमणूक करून अनुशेष भरून काढण्यासाठी माजी सैनिक उपलब्ध होत नसल्यास खालील घटकातील मागासवर्गीय उमेदवारांना देखिल सुरक्षा रक्षक पदासाठी अर्ज करण्यास मुभा देण्यात यावी व त्यांची नेमणूक सुरक्षा रक्षक पदी करण्यासाठी पुढील कार्यवाही करावी.

१] पोलिस कर्मचारी.

.. २ ..